**शपथेवर सरतपास श्री दुर्गे वकीलसाहेब अर्जदारातर्फे :—**

१०. आता मला माझे शपथपत्र नि.क्र. यु—०९ दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे आईचे आधार कार्ड व गैरअर्जदार यांनी माझे आईला दिलेल्या गेट पासची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेले प्रती दाखविल्या त्यास अनुक्रमे **नि. यु—१८ व यु—१९** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल सरपंच ग्रामपंचायत दुर्गापूर यांनी आम्हाला दिलेले वारसान प्रमाणपत्र दाखविले त्यास **नि. यु—२०** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे, माझे वडिल नामे सिध्दार्थ सापेकर, माझा भाउ सागर सापेकर व संदिप सापेकर व माझी बहिण सुषमा लदे यांच्या आधार कार्ड च्या मुळ प्रतीवरून पडताळणी केलेल्या प्रती दाखविल्या त्यास अनुक्रमे **नि. यु—२१ ते यु—२५** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल आमच्या रेशन कार्डची मुळ प्रतीवरून पडताळणी केलली प्रत दाखविली त्यास **नि. यु—२६** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे आईच्या बॅक पासबुक चे प्रथम पानाची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली त्यास **नि. यु—२७** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी आमचे अधिवक्ता यांच्या मार्फत गैरअर्जदार यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या नोटिसची माझी कार्यालयीन प्रत दाखविली त्यास **नि. यु—२८** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझी अधिवक्ता यांना गैरअर्जदार यांचे अधिकवक्ता यांनी आम्ही दिलेल्या नोटिसला दिलेल्या दोन उत्तराच्या प्रती दाखविल्या त्यास **नि. यु—२९ व यु—३०** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझे आई सुनिता सापेकर यांचे मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रतीवरून पडताळणी केलेली प्रत दाखविली त्यास **नि. यु—३१** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मी गैरअर्जदार यांना माझे अधिवक्ता यांच्या मार्फत पाठविलेल्या नोटिस गैरअर्जदार क्र. ०१ यांना मिळाल्याची पोचपावती दाखविली त्यास **नि. यु—३२** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल आकस्मात मृत्यू खबरी बुक तिची सत्यप्रत दाखविली त्यास **नि. यु—३३** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल

माझी आई सुनिता सापेकर यांच्या शवविच्छेदन अहवालाची सत्यप्रत दाखविली त्यास **नि. यु—३४** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल मरणावेशन प्रतिवृत्त ची सत्यप्रत दाखविली त्यास **नि. यु—३५** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल घटनास्थळ पंचनामा ची सत्यप्रत दाखविली त्यास **नि. यु—३६** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल फॉर्म ४ मधील माझी आई सुनिता सापेकर यांचे मृत्यू च्या कारणाचे प्रमाणत्र ची छायांकित प्रत दाखविली सदर दस्त हा शासकीय सामान्य रूग्णालय, चंद्रपूर यांनी दिलेले आहे त्यास **आर्टीकल ए** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल वैद्यकीय अधिकारी सामान्य रूग्णालय चंद्रपूर यांनी पोलिस स्टेशन चंद्रपूर यांना माझी आई सुनिता सापेकर यांचा मृत्यू झाल्याबाबत दिलेल्या पत्राची छायांकित प्रत दाखविली त्यास **आर्टीकल बी** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझी आई सुनिता सापेकर यांना सामान्य रूग्णालय येथे दाखल केल्यानंतरचे रूग्णपत्रिका ची छायांकित प्रत दाखविली त्यास **आर्टीकल सी** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझी आई सुनिता सापेकर यांची माझे जुन २०१८ ची वेतन चिठ्ठी ची छायांकित प्रत दाखविली त्यास **आर्टीकल डि** देण्यात येते. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल माझी आई सुनिता सापेकर यांचा शाळा स्थानांतर प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखविली त्यास **आर्टीकल इ** देण्यात येते.

सरतपास पुर्ण झाला. माझे समक्ष

उलटतपासकरीता तहकुब. स्वा/—

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश
दि. २७/०२/२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर.